**PM-USHA योजनेतंर्गत मंजूर प्रकल्पातील कामाचे तांत्रिक दृष्टया पर्यवेक्षण व संनियत्रण करण्याच्या अनुषंगाने रूसा संचालनालयाला सहकार्य करण्यासाठी नोडल तांत्रिक संस्थेची नेमणूक करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:-रुसायो २०२४/प्र.क्र.५१/विशि-३**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २६ जुलै, २०२४.

**संदर्भ** :- १. शासन निर्णय क्र.रुसायो-२०१३/प्र.क्र.४१८/विशि-३, दिनांक- २० मे,२०१५

२. सह संचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), मुंबई यांचे पत्र क्र.राप्रसं/रुसा/२०२४-२५/११९, दिनांक १०.०५.२०२४.

**प्रस्तावना** :

राज्यात उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पायाभूत सुविधा यांचे सबलीकरण करण्यासाठी एकछत्री योजना अभियान स्वरुपात राबविण्याकरीता केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा) ही योजना राबविण्याचे ठरविले असून, या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक २० मे,२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्य प्रकल्प संचालनालयाला सहकार्य करण्यासाठी तांत्रिक सहाय्य गट (TSG) स्थापन करण्यात आलेला आहे. आतापर्यत, योजनेमध्ये रुसा १.० आणि रुसा २.० असे दोन टप्पे केंद्र शासनातर्फे मंजूर करण्यात आले असून राज्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

आता केंद्र शासनाने रुसा ३.० हा टप्पा प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान (PM-USHA) या नावाने जाहीर केला असून या योजनेच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान (PM-USHA) योजने अंतर्गत शासकीय/ शासकीय अनुदानीत महाविद्यालय आणि शासकीय अकृषी राज्य विद्यापीठांना उच्च शिक्षण पध्दतीमध्ये संधी उपलब्धता, समानता आणि उच्चत्तम गुणवत्ता धारण करण्यासाठी अनुदान देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने PM-USHA योजनेत सहभाग नोंदविला असून महाराष्ट्रात घटक-१ Multidisciplinary and Research University मध्ये ४ विद्यापीठांना, घटक-२ Grants to Strengthen University मध्ये ७ विद्यापीठांना, घटक-३ Grants to Strengthen Colleges मध्ये ४३ महाविद्यालयांना, घटक-५ Gender Inclusion and Equity Initiatives मध्ये ४ जिल्हयांना केंद्राकडून मंजूरी देण्यात आली आहे.

PM-USHA योजनेंतर्गत बहुतेक कामे बांधकामाशी संबंधीत आहेत. त्यामध्ये नवीन हॉल, इमारत, वर्गखोली, वसतीगृह, इत्यादी कामे केली जातात. सदरील कामे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाप्रमाणे करणे अपेक्षित असून, ही सर्व कामे मार्च, २०२६ पर्यत पूर्ण करावयाची आहेत. PM-USHA योजने अंतर्गत होणाऱ्या बांधकाम, नुतनीकरण व साहित्य खरेदीच्या होणाऱ्या कामाचे तांत्रिक बाबीचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने रूसा संचालनालयाला सहकार्य करण्यासाठी त्रयस्त नोडल तांत्रिक संस्था नियूक्त करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

PM-USHA ही एक केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेतंर्गत राज्यातील विद्यापीठ/ महाविद्यालय यांना योजनेच्या घटकनिहाय कामांसाठी मोठया प्रमाणात निधी मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे PM-USHA योजनेतील कामांचे तांत्रिक दृष्ट्या पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याच्या अनुषंगाने रूसा संचालनालयाला सहकार्य करण्यासाठी **वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई** (VJTI, Mumbai) या संस्थेस नोडल तांत्रिक संस्था म्हणून नेमण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. नोडल तांत्रिक संस्थेने Civil/ Structural Engineering या विभागामधील अनुभवी आणि वरीष्ठ प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक यांची या कामासाठी नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी आणि त्याबाबतची माहिती राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांना सादर करावी. प्रकल्पातील कामास अनुसुरुन इतर तज्ञ व्यक्तींची नेमणूक ही नोडल तांत्रिक संस्था करु शकेल.

३. **<u>नोडल तांत्रिक संस्थेचे कार्य खालील प्रमाणे असेल.</u>**

i. PM-USHA योजनेतंर्गत मंजूर प्रकल्पातील कामांचे तांत्रिक दृष्टया पर्यवेक्षण व नियंत्रण करुन राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांना सहकार्य करणे.

ii. विद्यापीठ/महाविद्यालयांकडून प्राप्त DPR ची तपासणी करणे त्याबाबत अभिप्राय राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांना कळविणे.

iii. नवीन बांधकाम/नुतनीकरणबाबत नोडल तांत्रिक संस्थेचे नोडल अधिकारी यांनी प्रकल्पातील कामांना किमान ३ टप्प्यात भेटी देणे.

iv. नोडल अधिकाऱ्यांनी भेटी दिल्यांनंतर झालेल्या कामाची तपासणी करताना प्रामुख्याने खालील बाबी तपासून अहवाल राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांना सादर करावा.

   a. काम DPR प्रमाणे झाले आहे काय?
   b. झालेल्या कामाची मुल्यमापन योग्य आहे काय.?
   c. कामाची गुणवत्ता. ?

v. बांधकाम व नुतनीकरणाबाबत विद्यापीठ/महाविद्यालय यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

४. नोडल तांत्रिक संस्थेस त्यांना वरील नमूद केल्याप्रमाणे पर्यवेक्षणसाठी प्रकल्पाच्या संबंधीत कामाच्या मंजूर रक्कमेच्या ०.१ % दरानुसार राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) मार्फत मानधन (फी) अदा करण्यात येईल.

५. नोडल अधिकारी यांना महाविद्यालय/विद्यापीठांच्या कामांना भेटी दिल्यावर शासकीय नियमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेले दैनिक भत्ता व प्रवास भत्ता संबंधित नोडल तांत्रिक संस्थेकडून अनुज्ञेय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७२६१४५०२४७००८ हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT DATTATRAYA KATKAR

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=6ab66d3253a5332c701bb9922697b252de2300d3e9cfe0b93c88e8c299b219a8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1DAE81E2CCBD6C60BC3D691080DEA5E5428071B91ADE593F8D918786037CB6A1, cn=AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2024.07.26 15:05:01 +05'30'

**(अ. द. काटकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
६) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
९) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवड नस्ती (विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.